**आदेश**

क्र.नियोजन/स्थाविका/प्रमा-२०१०-११/१०४६
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
दिनांक :-०९ सप्टेंबर २०१०.

विषय :- **प्रशासकीय मान्यता**
**वर्ष २०१०-२०११ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम**

वाचा :- १. शासन परिपत्रक नियोजन विभाग क्र. एसडीपी-१०९६/प्र-२६/का-१४४५ दि.२८-९-१९९८
२. नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र.स्थाविका २००४/प्र.क्र.२७/का.१४४५/दि. १९.०४.२००४
३. या कार्यालयाचे पत्र क्रं.नियोजन/आ/टाईप प्लान/२००५-०६/३७१ दि.१०.८.२००५
४. नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. स्थाविका २०१०/प्र.क्र.६१/का.१४८२ दि.१२.०७.२०१०

कळमनुरी विधानसभा मतदार संघासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात प्रस्तावीत केलेल्या मा.आ.श्री. राजीव सातव यांच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावीत केल्यानुसार अनुज्ञेय असलेल्या निधीच्या मर्यादेत खालिल तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे रु. ०.४२ लाख किंमतीच्या एका कामासाठी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परीषद, हिंगोली यांना खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

(रू.लाखात)

| अ. क्र. | यंत्रणेचे/कामांचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत | प्रशासकिय मंजुरी दिलेली तरतुद |
|---|---|---|---|
| | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, विभाग, जि.प.,हिंगोली | | |
| १ | मौ. निशाना ता. औंढा येथे महादेव मंदिरासमोर विंधन विहीर करणे | ०.४२ | ०.४२ |
| | **एकुण** | **०.४२** | **०.४२** |

**अटी :**

१. सदर कामांच्या अंदाजपत्रकांना संबंधित कार्यान्वयीन अभिकरणांनी तांत्रिक मंजूरी दिली. असल्याने तसेच प्रस्तावातील घेण्यांत आलेले वाहतुक दर योग्य व अचुक असल्या बाबत,व अंदाजपत्रक अदयावत दरसुचीने केले आहे या बाबतची व ईतर तांत्रिक बाबींची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी अभिकरणाची राहील.

२. प्रस्तावीत काम ज्या जागेवर करावयाचे आहे ती जागा शासनाच्या मालकीची/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्याचे खात्री करुनच कामास प्रत्यक्षात सुरुवात करावी अन्यथा याची सर्वस्वी जवाबदारी संबधित यंत्रणेची राहील.

३. प्रस्तावीत केलेले काम जर ग्रामीण भागातील असेल तेंव्हा कार्यान्वयीन यंत्रणेने संबंधित ग्रामपंचायतचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याची खात्री करुनच प्रत्यक्षात कामास सुरुवात करावी.

४. प्रशासकीय मान्यता दिलेले काम अंदाजपत्रकात नमुंद केलेल्या तांत्रिक मान्यते प्रमाणेच तसेच दिलेल्या दर्शक नकाशा प्रमाणेच करणे आवश्यक आहे. अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी संबधित यंत्रणेची राहील.

५. या कार्यक्रमांतर्गत मंजूर काम सोबतच्या १ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे कार्यान्वयिन यंत्रणा यांचेवर बंधनकारक राहिल.

६. सदरची कामे या व अन्य कार्यक्रमामधून यापुर्वी घेण्यात आली असल्यास ही मंजुर कामे सुरु करु नयेत अशा परिस्थीतीत याची माहीती संबधित लोकप्रतीनिधीस/या कार्यालयास अवगत करावी व पुढील कोणतीही कार्येवाही करण्यांत येऊ नये अन्यथा याची सर्वस्वी जवाबदारी संबधित यंत्रणेची राहील.

७. ज्या कामास या आदेशाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापुर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे/जलविघुत/पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली किंवा अन्य बांधकामामध्ये जाणार नाही किंवा अशा प्रकल्पाचा या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची पुन्हा खात्री करुन घ्यावी.

८. या कार्यक्रमाखाली येणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि खर्चाचा प्रगती अहवाल या कार्यालयास महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पाच तारखेपर्यंत पाठवावा. काम पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र व पुर्णत्वाचा दाखला सादर करण्यात यावा.

९. काम संपल्यानंतर कामाचे परिरक्षण/देखभाल करण्यासाठी संबंधीताच्या ताब्यात दयावे व तसे या कार्यालयास कळवावे. काम सुरु करण्यापुर्वी सर्व संबधितांकडुन ना हरकत प्रमाणपत्र तसेच देखभाल व दुरुस्तीचे हमी पत्र घेतल्यानंतरच प्रत्यक्ष कामास सुरवात करावी.

१०. काम सुरु करणेपुर्वी व काम पुर्ण झालेनंतर कामाचे ठिकाणाचे फोटो काढून या कार्यालयास सादर करावेत, तसेच कामाचे ठिकाणी नावाचा बोर्ड बसवावा.

११. कार्यकारी यंत्रणेने कामांस प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेत काम करावे, प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च करु नये. प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा जास्तीचा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वियीन यंत्रणेची राहील.

१२. या कार्यक्रमावर येणारा खर्च २०१०-२०११ या वित्तीय वर्षात खालील लेखा शिर्षाखाली होणाऱ्या तरतुदीतुन भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्च टाकण्यात यावा.

नियोजन विभाग,मागणी क्र. ओ-९
४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च,
१०२-सामुहिक विकास-
पंचवार्षीक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना
(१) बहुउददेशीय कार्यक्रम,
(०० )(०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम(संकेतांक ४५१५००१२)

जिल्हाधिकारी व सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, हिंगोली.

प्रति,

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प., हिंगोली

**<u>प्रतीलिपी माहीतीस्तव सादर,</u>**

मा. आ. श्री. राजीव सातव, विधानसभा सदस्य, कळमनुरी.

जिल्हाधिकारी व सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, हिंगोली.